Shanti Education Society's
# A. G. Patil Polytechnic Institute, Solapur
NBA ACCREDITED PROGRAMS
(Approved by AICTE, New Delhi; Recognized by Govt. of Maharashtra; Affiliated to MSBTE, Mumbai)
ISO 9001:2015 CERTIFIED DTE Inst. Code : D6443 MSBTE Inst. Code : 0995

18(2/2A)2, Pratap Nagar, Opp. S.R.P. Camp, Vijapur Road, Solapur- 413008 (Maharashtra, India)
Ph.No.: 0217-2341899 E-mail: agppi.contact@gmail.com Web: www.agppi.edu.in

AGPPI/Admin./Internal/2026-27/039 Date: 29.09.2026

## हिवाळी परीक्षा-२०२६ विषयकअतिमहत्वाची सुचना

### दिव्यांग परीक्षार्थीकरीता लेखी परीक्षेसाठी वेळ वाढवुन किंवा लेखनिक मिळणेबाबत..

संदर्भ : मरातंशिमं / विकपु / विवि /हि.प.२०२६ / ज्यादा तास / लेखनिक२०२६ / १४२२, दि. २९.०९.२०२६.

सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या हिवाळी-२०२६ लेखी परीक्षेकरीता संदर्भिय पत्रानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना म्हणजे जे विद्यार्थी ४०% पेक्षा जास्त अपंग आहेत; अशा विद्यार्थ्यांकरीता मंडळाकडून परीक्षेची वेळ वाढवून दिली जाणार आहे, तसेच खालील नमुद लेखनिक नेमणुकीच्या नियमावलीनुसार लेखनिकच्या नेमणुकीस परवानगी दिली जाणार आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

- वेळ वाढवून मिळणेबाबत :

१. विद्यार्थ्यांचा अर्ज.
२. प्रवेश निश्चितीचे पत्र.
३. विद्यार्थ्यांचे ४०% पेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्राची छायाप्रत
(अलीकडील छायाचित्र चिकटवुन नुतनीकरण केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र)

- लेखनिकमिळणेबाबब :

१. विद्यार्थ्यांचा अर्ज.
२. प्रवेश निश्चितीचे पत्र.
३. विद्यार्थी असमर्थ असल्याबाबतचे डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र.
४. लेखनिक म्हणून बसणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीचे बोनाफाईड सर्टिफिकेट.
५. लेखनिक म्हणून बसणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीच्या शाळेचे ना हरकत प्रमाणपत्र.
६. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा तांत्रिकशिक्षण न घेतलेला व १० वी पर्यंतच शिकलेला असावा.
७. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा परीक्षार्थीचा नातेवाईक आणि संस्थेचा कर्मचारी नसावा.

तरी ज्या विद्यार्थ्यांना सदर संधीचा लाभ घ्याव्याचा आहे; अशांनी वर नमुद आवश्यक कागदपत्रांसह आपला अर्ज गुरूवार, दि. ०१.१०.२०२६ रोजी दु. ३.३० वाजेपर्यंत कार्यालयात श्री. ए. व्ही. मोफरे यांच्याकडे जमा करावे. मुदतीत अर्ज सादर न केल्यास होणाऱ्या शैक्षणिक नुकसानिस विद्यार्थी स्वतः जबाबदार असतील याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

टिप :

१. विभागप्रमुख व प्रथम वर्ष इन्चार्ज यांनी आपल्या स्तरावरून सदर महत्वाची बाब विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्यावी आणि सदर लाभ घेण्यास इच्छुक कोणताही दिव्यांग विद्यार्थी लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.
२. अपवादत्मक परिस्थितीत जसे एखादया विद्यार्थ्याचा अचानक अपघात झाला किंवा अचानक नैसर्गिक दुर्घटना परीक्षार्थी च्याबाबतीत घडली तरच अशा प्रसंगी अचानक येणाऱ्या अर्जांचा मंडळाकडुन कालमर्यादा न पाहता विचार केला जाणार आहे.

29.9.26

डॉ. एम्. ए. चौगुले
प्राचार्य,
ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिटयुट
सोलापूर.

प्रत :
1. VP
2. CE
3. CO
4. EE
5. EJ
6. ME
7. H&S
8. S.S.
(Mr. A. V. Mophare / Mr. V. A. Kadam / Mr. G. N. Dhokate)
9. Exam. Section
10. Instt. Web.
11. Accout Section
12. Admin.

# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ

## विभागीय कार्यालय, पुणे

( स्वायत्त )( ISO9001:2015 )( ISO/IEC – 27001:2013)
४१२/ब, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षणमंडळाची नविन इमारत, चौथा मजला,
बहिरट पाटील चौक, मॉडेलकॉलनी, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६
Email :rbtepn@msbte.ac.inदूरध्वनी क्र. (०२०) २५६५६९९४Web :www.msbte.ac.in


जा.क.मरातशिमं/विकापु/विवि/हि. प. २०२६/ज्यादा तास/लेखनिक २०२६/1422 दिनांक – 2 [illegible] २०२६

A.G. PATIL POLYTECHNIC INSTITUTE, SOLAPUR
Inward No :- 231
Date :- 29/09/2026
Forward to :-

**वेब परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,
पुणे विभागातील सर्व पदविका अभ्यासकमाच्या संस्था.

**विषय** – हिवाळी परीक्षा २०२६ मध्ये आपल्या संस्थेतील दिव्यांग परीक्षार्थीकरीता वेळ वाढवून/लेखनिक मिळणेबाबतचे अर्ज सादर करणेबाबत.

**संदर्भ** – १. Desk 40 MSBTE यांचा दि. २८/०९/२०२६ रोजीचा ईमेल.
२. शासन निर्णय क. संकिर्ण -२०१६/पत्र कं. ३०२/विशि-३/ दि.०४/०३/२०१७.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई या मुख्यालयामार्फत उन्हाळी व हिवाळी पदविका परीक्षा घेतल्या जातात. परीक्षा कालावधीत या कार्यालयास संस्थेतील दिव्यांग परीक्षार्थीकरीता मंडळाच्या परीक्षा नियमावलीच्या पुस्तकातील नियम क. RG-10(G) प्रमाणे संस्था प्रमुखांमार्फत लेखी परीक्षेसाठी वेळ वाढवून मिळणेबाबत तसेच परीक्षार्थ्यास लेखनिक मिळणेबाबत अर्ज प्राप्त होतात. सदरचे परिक्षार्थीचे अर्ज या विभागीय कार्यालयास सादर करताना संस्था प्रमुखांनी खालील बाबी पडताळून व पत्रामधील संस्थेच्या प्राचार्यांनी संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश दिव्यांग राखीव जागेतून झाला किंवा कसे? याबाबतचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच, लेखी परीक्षेसाठी वेळ वाढवून देणे अथवा लेखनिक मिळणे याबाबतची शिफारस करतांना संदर्भ पत्र क. २ चे अवलोकन करावे. संबंधित विद्यार्थी संदर्भ पत्र क. २ मध्ये नमुद केलेल्या नियमाप्रमाणे पात्र असल्यासच या कार्यालयाकडे शिफारस करण्यात यावी. तसेच, परीक्षेसाठी संदर्भ पत्र क. २ मधील तरतुदींचा नियोजन करणे आवश्यक आहे. सदर विद्यार्थ्यांचे अर्ज व खालील दिलेल्या तक्त्यात दिव्यांग परिक्षार्थींची माहिती भरुन खालील आवश्यक कागदपत्रांसहीत दि. ०७/१०/२०२६ पर्यंत या कार्यालयास सादर करावित.

| Sr. No. | Instt. Code | Instt. Name | Enrollment No. | Student Name | Course Code | Disability Type | Request For Extra Time (Yes/No) | Request For Writer (Yes/No) | Writer Name |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

- **लेखी परीक्षेसाठी वेळ वाढवून मिळणेबाबत.**

१. संस्था प्रमुखांचा सही व शिक्का नमूद केलेले संस्थेचे पत्र.
२. संबंधित विद्यार्थ्यांचा अर्ज.
३. संबंधित विद्यार्थ्यांचे ४०% पेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत.
४. विद्यार्थ्यांचा नोंदणी कमांक (Enrollement No.), सत्र (Semester) उदा. CE4G.

To O.S.
Pl. inform to VP
all HOD FY.S.
A.C. for n...
29.9.[illegible]

- <u>लेखनिक मिळणेबाबत.</u>
  १. संस्था प्रमुखांचा सही व शिक्का नमूद केलेले संस्थेचे पत्र.
  २. संबंधित विद्यार्थ्यांचा अर्ज.
  ३. विद्यार्थी असमर्थ असल्याबाबतचे डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र.
  ४. लेखनिक म्हणून बसणा–या विद्यार्थी/विद्यार्थीनीचे बोनाफाईड सर्टिफिकेट.
  ५. लेखनिक म्हणून बसणा–या विद्यार्थी/विद्यार्थीनीच्या शाळाचे ना हरकत प्रमाणपत्र.
  ६. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा तांत्रिक शिक्षण न घेतलेला व १० वी पर्यंतच शिकलेला असावा.
  ७. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा परीक्षार्थींचा नातेवाईक आणि संस्थेचा कर्मचारी नसावा.

लेखनिकाची व्यवस्था पालकांनी महाविद्यालयाचे सहकार्याने करावी. अन्यथा महाविद्यालयाने लेखनिकाची यादी ठेवावी व या यादीतून लेखनिक देण्यात यावा. आवश्यक्तेनुसार सांकेतिक भाषा विश्लेषक ( Sign Language interpreter) उपलब्ध करुन दयावा.

उपरोक्त अर्ज हे <u>दि. ०७/१०/२०२६</u> पर्यंतच या कार्यालयास प्राप्त होणे गरजेचे आहे. तसेच संस्थेच्या पत्रात संस्था प्रमुखांचा तसेच सदर विषय हाताळणा–या लिपिकाचा भ्रमणध्वनी कमांक व ईमेल आयडी (Mobile No. & E-mail ID) नमूद करणे अपरिहार्य आहे.

जर परीक्षेआधी एक किंवा दोन दिवस संस्थांकडून अर्ज प्राप्त झाले व त्यानंतर संस्था प्रतिनिधींनी दूरध्वनीव्दारे सदर प्रकरणाचा निपटारा करण्यास घाई केली व सदरचे पत्र टपाल खात्याकडून संस्थेस उशिरा प्राप्त झाले व त्यामुळे जर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले तर या गोष्टीस संस्था प्रमुख जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

अपवादात्मक परिस्थितीत जसे एखादया विद्यार्थ्यांचा अचानक अपघात झाला किंवा अचानक नैसर्गिक दुर्घटना परिक्षार्थीच्या बाबतीत घडली तरच अशा अर्जाचा विचार करण्यात येईल.

कोणताही दिव्यांग विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी प्राचार्यांनी घ्यावी.

२१/०४/२६

(डॉ. विजय मा. कोल्हे)
उपसचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
विभागीय कार्यालय,पुणे–१६